
खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया
इथे स्कॅन करा
Plz Scan
Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १७६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०७ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# भारताच्या यंग ब्रिगेडने जिंकला वर्ल्ड कप!

## भारताने कोरले सहाव्यांदा विश्वचषकावर नाव

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, झिम्बाब्वे :** अंडर १९ विश्वचषकाच्या फायनल सामन्याचा थरार झिम्बाब्वे येथे रंगला. भारत आणि इंग्लंड १९ वर्षाखालील संघात फायनल सामना रंगला. या फायनल सामन्याचे नाणेफेक भारताने जिंकले. कर्णधार आयुष म्हात्रेने नाणेफेक जिंकून प्रथम बॅटिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करत भारताने ४११ धावा केल्या. लक्ष्यप्राप्ती करताना इंग्लंडला फक्त ३११ धावा करता आल्या. भारताने तब्बल १०० धावांनी विश्वचषक जिंकला.

भारताने २०२६ U19 World Cup जिंकला आहे. टीम इंडियाने अंतिम सामन्यात इंग्लंडचा १०० धावांनी पराभव केला. भारताने १९ वर्षांखालील विश्वचषक जिंकण्याची ही सहावी वेळ आहे. वैभव सूर्यवंशीच्या १७५ धावा आणि गोलंदाजांच्या दमदार कामगिरीमुळे भारताला ऐतिहासिक विजय मिळाला. इंग्लंडला २८ वर्षांचा जेतेपदाचा दुष्काळ संपवण्याची संधी होती, परंतु त्यांना भारतीय संघाचे आव्हान पार करण्यात अपयश आले. अंडर १९ विश्वचषकाच्या इतिहासात कोणत्याच संघाला ३५० पेक्षा जास्त धावा काढता आल्या नाही. भारत हा पहिला संघ बनला त्यामुळे फायनल सामन्यात भारताने ऐतिहासिक कामगिरी केली.




झिम्बाब्वेची राजधानी हरारे येथे खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करताना ४११ धावा केल्या. १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात कोणत्याही संघाने केलेली ही सर्वोच्च धावसंख्या होती. वैभव सूर्यवंशीने ८० चेंडूत १५ चौकार आणि १५ षटकार मारत १७५ धावा केल्या. भारताचा कर्णधार आयुष म्हात्रेने अर्धशतक ठोकले. त्याने ५१ चेंडूत ५३ धावा केल्या. भारताकडून सर्वाधिक विकेट या अंबरीश सुकुमारने काढल्या. त्याने तीन विकेट काढल्या. प्रत्युत्तरात इंग्लंडला फक्त ३११ धावा करता आल्या. इंग्लंडने १७७ धावांवर सात विकेट गमावल्या होत्या, परंतु कॅलेब फॉकनरने एका लढाऊ शतकासह इंग्लंडला विजयाच्या जवळ आणण्यासाठी धाडसी प्रयत्न केले. त्याने ६७ चेंडूत ११५ धावांची शानदार खेळी केली, पण इंग्लंडचा जेतेपदाचा दुष्काळ संपवू शकला नाही.

**भारत सहाव्यांदा विजेता ठरला**

भारतीय संघाने सर्वाधिक वेळा १९ वर्षांखालील विश्वचषक जिंकण्याचा स्वतःचा विक्रम सुधारला आहे. भारत आता सहाव्यांदा विजेता बनला आहे, या यादीत ऑस्ट्रेलियानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याने चार वेळा १९ वर्षांखालील विश्वचषक ट्रॉफी जिंकली आहे.

# टी-२० वर्ल्ड कप थराराला आजपासून सुरूवात !




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, मुंबई :** वर्ल्ड कप स्पर्धेस आज शनिवार पासून सुरुवात होत आहे. क्रिकेट चाहते वर्ल्ड कप सुरू होण्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. आज शनिवार ७ फेब्रुवारीला वर्ल्ड कपचे तीन सामने पार पडणार आहेत. तीन सामन्यांमध्ये एक सामना भारताचाही असणार आहे. हा सामना कधी आणि कुठे असणार आहे? सर्व माहिती जाणून घ्या. वर्ल्ड कपमधील पहिला सामना पाकिस्तान वि. नेदरलँड असा असणार आहे. (कोलंबो, सकाळी ११ वाजता) दुसरा सामना वेस्ट इंडिज वि. स्कॉटलँड (कोलकाता, दुपारी ३ वाजता) आणि तिसरा सामना भारत वि. युएसए (मुंबई, संध्याकाळी ७ वाजता) असणार आहे.

भारतीय संघाचा पहिला सामना मुंबईमधील वानखेडे मैदानावर हा सामना होणार आहे. बलाढ्य भारताविरूद्ध दुबळ्या युएएचे निभाव लागतो की नाही पाहावे लागेल. भारतीय संघात एकापेक्षा एक तगडे खेळाडू आहेत. कॅप्टन सूर्यकुमार यादव याचे होम ग्राऊंड आहे. हा सामना संध्याकाळी सात वाजता सुरू होईल. तर त्याआधी ६.३० वाजता टॉस होणार आहे. हा सामना टीव्हीवर पाहण्यासाठी स्टार स्पोर्ट्स नेटवर्क आणि मोबाईलवर पाहण्यासाठी हॉटस्टार अॅपवर पाहता येणार आहेत. सूर्यकुमार यादव अँड कंपनीच्या वर्ल्ड कप मोहिमेला सुरूवात होणार आहे.

भारतीय संघाची तयारी पाहिली तर तगडी आहे. आता झालेल्या न्यूझीलंडविरूद्धची मालिका खिशात टाकली. भारताची बॅटींग ऑर्डक प्रतिस्पर्धी गोलंदाजांवर तुटून पडत आहे. त्यामुळे युएसएस कशी टक्कर देतो हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. स्पर्धेपूर्वीची कर्णधारांची पत्रकार परिषद आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) एकाच वेळी मुंबई आणि कोलंबो येथे घेतली होती. सूर्याला पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याबाबत विचारणा करण्यात आली. सूर्या या प्रश्नास तयारच होता. त्याने भारतीय संघाचा कार्यक्रम ठरलेला आहे. त्यानुसारच सर्व काही होईल, असे सांगितले. त्याने जणू याबाबत जे काही ठरवायचे आहे, ते पाकिस्तानने हेच सांगितले.


'आमची मनोभूमिका स्पष्ट आहे,' सूर्याने खास त्याच्या शैलीत ठामपणे सुरुवात केली. 'आम्ही त्यांच्याविरुद्ध खेळण्यास नकार दिलेला नाही. त्यांनी खेळणार नाही, असे म्हटले आहे. आमची विमानाची तिकिटे आरक्षित झालेली आहेत. त्यानुसार आम्ही कोलंबोला जाणार आहोत. आमचा कार्यक्रम तयार आहे. शनिवारी आम्ही अमेरिकेविरुद्ध खेळणार आहोत. त्यानंतर आमची कॅनडाविरुद्ध लढत आहे. त्यानंतर आम्ही कोलंबोसाठी निघणार आहोत. त्यानंतरचे तिकडे गेल्यावरच बघू,' असे सूर्याने स्पष्ट केले.

# लाडक्या बहिणींना मोठा दिलासा!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंतर्गत लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याचे प्रकार समोर आले आहेत. ई-केवायसी करताना चुकीचा पर्याय निवडल्यानं अनेक पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळालेला नाही.

त्यामुळे शासनानं अशा महिलांना दुरुस्तीची संधी उपलब्ध करुन दिली आहे. याबद्दलची माहिती महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दिली आहे.



'e-KYC प्रक्रिया करताना काही लाभार्थ्यांकडून चुकीचा पर्याय निवडला गेल्याने योजनेचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. विशेषतः ज्या पात्र लाभार्थ्यांनी e-KYC करूनही त्यांना अद्याप योजनेचा लाभ मिळालेला नाही, अशा सर्व बहिणींना आपली e-KYC माहिती दुरुस्ती करण्यासाठी पुन्हा एकदा संधी देण्यात येत आहे,' असं अदिती तटकरे यांनी एक्स पोस्टमध्ये नमूद केलं आहे.

'ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत e-KYC मध्ये दुरुस्ती करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा हीच महिला व बालविकास विभागाची प्रामाणिक भूमिका आहे. म्हणूनच, ज्या लाडक्या बहिणींच्या e-KYC प्रक्रियेत काही चूक झाली आहे, त्यांनी मुदतीपूर्वी दुरुस्ती करून घ्यावी ही नम्र विनंती,' असं आवाहन अदिती तटकरेंनी केलं आहे.

e-KYC प्रक्रिया करताना कोणतीही चूक झाली असल्यास सर्व लाडक्या बहिणींनी मुदतीपूर्वी आवश्यक दुरुस्ती करुन घ्यावी, असं आवाहन महिला आणि बालकल्याण विभागाकडून करण्यात आलं आहे. योग्य माहिती अपडेट झाल्यानंतर पुन्हा एकदा अर्जाची पडताळणी केली जाईल आणि पात्र महिलांना योजनेच्य अंतर्गत लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.

# नाशिकमध्ये कुंभमेळ्यासाठी प्रशस्त बाह्य रिंगरोड

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, नाशिक :** साहेब 'बाह्य रिंगरोडमुळे आमच्या गोवर्धन गावाचे दोन भाग होत आहेत. गावाची ओळख अन् अस्तित्त्वच संपुष्टात येणार आहे'. 'सर, आमच्या मातोरीची स्मशानभूमि रिंगरोडमध्ये जात असून, नवीन स्मशानभूमीसाठी ग्रामपंचायतीकडे जागाच नाही. त्यामुळे अलाइन्मेंट बदलून आमची स्मशानभूमि वाचवा'. 'आम्ही आधीच अल्पभूधारक आहोत. आहे ती जमीन रिंगरोडमध्ये चालली आहे. आम्ही भूमिहीन होत असून, शेतकरी ही ओळखच पुसणार आहे. आमच्या लेकराबाळांच्या भवितव्याचे काय?' 'तुम्ही रस्ता जरुर करा, पण शेतकऱ्यांच्या पोटावरुन रस्ता घालू नका', अशी कळकळीची विनंती शेतकऱ्यांनी काल गुरुवारी प्रशासनाला केली. जास्तीत जास्त घरे, विहिरी वाचतील अशारीतीने अलाइन्मेंटमध्ये बदल करण्याचा प्रयत्न यंत्रणा निश्चितपणे करेल, असे आश्वस्त करतानाचा कुठल्याही परिस्थितीत रस्ता सुरक्षेशी तडजोड केली जाणार नाही, असं जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी स्पष्ट केले.

**अलाइन्मेंट बदलण्याची मागणी**

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर बाह्य रिंगरोड उभारणीचा प्रकल्प सरकारने हाती घेतला असून, याकरिता जिल्हा प्रशासनाला शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनींची आवश्यकता आहे. शहरालगतच्या २५ गावांमधून हा रिंगरोड जाणार असल्याने जमिनींच्या अधिग्रहणाची प्रक्रिया प्रशासनाने सुरु केली आहे. परंतु, जमिनींना किती मोबदला मिळणार? अन्य गावांतील शेतकऱ्यांच्या बरोबरीने मोबदला मिळणार की कमी? यासारखे अनेक प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात आहेत. त्याची समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याने जमिनींच्या संयुक्त मोजणीला शेतकऱ्यांकडून विरोध होत आहे. अनेकांची राहती घरे, विहिरी या प्रकल्पात जात असल्याने अलाइन्मेंट बदलावी, अशी मागणी जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात शेतकऱ्यांना बैठकीसाठी निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी आमदार सरोज अहिरे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, 'एमएसआयडीसी'चे मुख्य अभियंता रणजित हांडे, उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ उपस्थित होते.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीकरिता संपूर्ण यंत्रणा सज्ज - जिल्हाधिकारी डुडी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, पुणे :** राज्य निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार लोकशाहीचा पवित्र उत्सव साजरा करताना मतदान अधिकाऱ्यांनी आपले कर्तव्ये जबाबदारीने बजाविण्याबाबत सूचना दिल्या आहेत; पात्र मतदारांनी निवडणुकीकरिता उत्स्फूतपणे मतदान करावे, नागरिक व राजकीय पक्षांनी आदर्श आचारसहिंतेचे पालन करून शांततेत पूर्ण प्रक्रिया पार पाडावी, संपूर्ण निवडणुकीच्या कामकाजाकरिता संपूर्ण यंत्रणा सज्ज आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डूडी यांनी पत्रकार परिषदेत केले आहे.


जिल्हा परिषदेच्या ७३ गट व पंचायत समितीच्या १४६ गणाकरिता शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० असून मतदानापुर्वी मॉक पोल घेतला जाणार आहे. मतदानाच्या दिवशी म्हणजे ७ फेब्रुवारी रोजी मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे किंवा समाज माध्यमांमध्ये कुठल्याच प्रकारच्या जाहिराती प्रसिद्ध अथवा प्रसारित करता येणार नाहीत.

**- मतदानाकरिता सार्वजनिक सुट्टी**

मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यक्षेत्रात ३ फेब्रुवारीच्या महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेद्वारे शनिवार, ७ फेब्रुवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. ही सार्वजनिक सुट्टी मतदार संघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामासाठी त्या मतदार संघाच्या बाहेर असतील त्यांना सुद्धा लागू राहील. केंद्र शासनाच्या शासकीय, निम्न शासकीय कार्यालय, सार्वजनिक उपक्रम बँका आदींना ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील. येत्या ७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानाकरिता जिल्ह्यातील अधिकाधिक मतदारांनी मतदान केंद्रावर जावून मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी केले आहे.

**- जिल्ह्यात ३ हजार ६०५ मतदान केंद्र**

बारामती तालुक्यात २९९, मावळ २४३, मुळशी २२७, शिरुर ३३७, हवेली २६३, दौंड ३१७, इंदापूर ४००, पुरंदर २३५, भोर २३७, वेल्हे १०५, आंबेगाव २३९, जुन्नर ३६६ आणि खेड ३३७ तालुक्यात असे एकूण ३ हजार ६०५ मतदान केंद्र आहेत. यामध्ये प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे १३ आदर्श व महिला मतदान केंद्र तसेच हवेली, भोर आणि इंदापूर तालुक्यात प्रत्येकी १ याप्रमाणे ३




परदानशीन मतदान केंद्र आहेत. मतदान प्रक्रियेकरिता १४ हजार ३१८ बॅलेट युनिट, ५ हजार ८१३ कंट्रोल युनिट यंत्र, मेमरी चीप ३ हजार ९६८, बॅटरी ३ हजार ९९१ वितरित करण्यात आले आहेत.

जिल्ह्यात २९ लाखाहून अधिक मतदार बजावणार मतदानाचा हक्क जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ करिता जिल्ह्यात ३ हजार ६०५ मतदान केंद्र असून याअंतर्गत पुरुष १५ लाख २७ हजार १५१, स्त्री १४ लाख ४९ हजार ५६० आणि इतर ९४ असे एकूण २९ लाख ७६ हजार ८०५ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे.

निवडणूक कामकाजाकरिता २३ हजाराहून अधिक कर्मचारी कार्यरत सर्व मतदान केंद्रावर केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आदी अधिकारी कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली असून संपूर्ण निवडणूक कामकाजाकरिता एकूण २३ हजार ११४ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता पर्याप्त व पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलींग पार्टी सर्व साहित्यासहित आपआपल्या मतदान केंद्रावर पोहोचल्या असून मतदान प्रक्रियेसाठी सुसज्ज आहेत. निवडणूकीच्या अनुषंगाने अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहेत. मतदान जनजागृती अभियानाअंतर्गत मतदानाची टक्केवारीत वाढ होण्याकरिता विविध प्रकारचे जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले आहे.

निवडणूकीकरिता ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतदानाची फेब्रुवारी ९ रोजी मतमोजणी सकाळी १० वाजल्यापासून करण्यात येणार आहे. निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांतता, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री.डुडी यांनी केले आहे.

# ।। गण गण गणात बोते ।।



**“ बुलढाणा जिल्ह्यातील श्री क्षेत्र शेगाव हे विदर्भातील पंढरी म्हणून ओळखले जाते. जवळपास ३२ वर्षे श्री गजानन महाराजांनी या परिसरात असंख्य भाविक भक्तांना मार्गदर्शन केले. साक्षात्कार घडवला. ते सिद्ध योगी सत्पुरुष होते. त्यांच्या तोंडी नेहमी गण गण गणात बोते हा मंत्र होता. गण म्हणजे- जीव, जीवात्मा. गण म्हणजे- शिव किंवा शिवात्मा. गणात म्हणजे- हृदयात. बोते म्हणजे पहा बघा. (हे जीवा स्वतःच्या हृदयात शिवाला परमेश्वराला बघ.) ”**

## प्रगटदिन विशेष !



दिलीप देशपांडे
जामनेर. जि.जळगांव
मोबा. ८९९९५६६९१७

।। अनंत कोटी ब्रम्हांडनायक महाराजाधिराज योगीराज परब्रम्ह सचिदानंद भक्तप्रतिपालक शेगाव निवासी समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज की जय।। म्हणून आपण त्यांचा जय जयकार करतो तेच श्री गजानन महाराज, शेगाव येथे (शके.१८००) २३ फेब्रुवारी १८७८ रोजी देविदास पातुरकर यांच्या घराच्या बाहेर उष्ट्या पत्रावळी टाकल्या होत्या, या पत्रावळी वरील अन्नाचे कण ते वेचून खात होते. आणि गाई, जनावरांना पिण्यासाठी ठेवलेले पाणी ते प्यायले. त्यावेळी बंकटलाल अग्रवाल यांच्या दृष्टीस ते पडले. हा दिवस होता, माघ वद्य सप्तमी. आणि म्हणूनच दासगणू महाराज यांनी पोथी मध्ये तसा उल्लेख केला आहे- माघ वद्य सप्तमी दिनी शेगावात प्रगटोनी उष्ट्या पत्रावळी निमित्त विदेहत्व तव हो प्रकट...

देहात असताना लाखो भाविकांना त्यांनी मार्गदर्शन केले. भक्तीने शक्ती कशी निर्माण होते, हा भक्ती मार्ग दाखवला. तसेच समाधी घेतल्यानंतरही त्यांनी असंख्य भाविकांना दर्शन दिले, तसेच त्यांच्या मनोकामना ही पूर्ण केल्यात. आणि म्हणूनच आज शेगांवला रोज हजारोने भाविक दर्शनासाठी रांगेत उभे असतात आणि तेथील महाप्रसादाचा लाभ घेत असतात. दर्शन आणि महाप्रसाद मिळावा म्हणून भाविकांची अलोट गर्दी गुरुवार शनिवार रविवारी मोठ्या प्रमाणावर असते. राज्य परराज्यातील भाविक प्रकट दिन, समाधी दिन, राम नवमी, महाशिवरात्र अशा विशेष दिवशी लाखोच्या संख्येने

येत असतात आणि त्या पुण्यभूमीला स्पर्श करीत असतात. अगदी दर्शन मिळाले नाही तरी कळसाचे दर्शन घेऊन समाधान आणि आनंद मिळवतात.

श्री संत गजानन महाराजांच्या अनेक लीला आहेत. श्री गजानन विजय ग्रंथात दासगणू महाराजांनी त्या नमूद केलेल्या आहेत. अनेक भक्त या पोथीचे मंदिरात किंवा घरीही पारायणे करतात. आणि त्यातूनच त्यांना खूप चांगले अनुभव येतात.आत्मिक समाधान मिळते.

काम, क्रोध, लोभ मोह, मत्सर, व अहंकार यांनी वेढलेल्या माणसाला चिंता आणि विवंचनापासून मुक्ती मिळवण्याकरीता योग्य मार्गदर्शन मिळते. ईश्वराच्या आराधनेतून मानवाला सन्मार्गावर आणण्याचे महान कार्य संत करीत असतात. अर्थातच ते गजानन महाराजांनी केले आहे. ह्याचा अनुभव वेळोवेळी भाविकांना येतोच.

गोविंद महाराज टाकळीकर हे शेगांवातील मोटे यांच्या श्री महादेवाच्या मंदिरात कीर्तन करीत असताना त्यांना श्री गजानन महाराज हे सिध्दपुरुष आहेत हे जाणवले. महाराजांनी त्यांच्या द्वाड घोड्याला शांत केले. महाराजांच्या आज्ञेवरून पितांबराने नाल्यात तुंबा बुडवून पाणी आणले. आणि आश्चर्य म्हणजे तुंब्यातील पाणी स्वच्छ झाले होते. जानकीराम सोनाराकडे विस्तवाची मागणी केल्यावर सोनाराचे मुलांने नकार दिला. तेव्हा श्री महाराजांनी विस्तवाविना चिलीम पेटवली.अक्षयतृतीयेच्या दिवशी जानकीरामच्या घरी आलेल्या अतिथींच्या पानात वाढलेल्या चिचवणीत अळ्या आढळल्याने सर्व अतिथी पानावरून उठून गेले.

श्री गजानन महाराजांना चिलीम ओढण्यासाठी विस्तव न दिल्याने ही घटना घडली हे जाणून जानकीराम ने आपली चूक कबूल केली व महाराजांची क्षमा मागितली व लगेच चिंचवणीतील आळ्या नाहीशा झाल्या. अकोली, अडगांव जवळ कोरड्या विहिरीत पाणी निर्माण करून भास्कर पाटील आणि गावकऱ्यांना महाराजांनी थक्क केले. बंकटलालने कणसे खाण्यासाठी महाराजांना आणि काही गावकऱ्यांना मळ्यात नेले होते. कणसे भाजण्यासाठी आग पेटविल्यामुळे मधमाशा पोळयातून बाहेर पडल्याने सगळ्यांनी धूम ठोकली. मात्र महाराज शांतपणे त्याच जागी बसले. शरीराला यत्किंचितही इजा झाली नाही. हरी पाटलांसारख्या श्रेष्ठ कुस्तीगिराच्या शक्तीचे महाराजांनी गर्वहरण केले. मारुती मंदिरात पाटलाच्या मुलांनी पाठीवर उसाचा मार दिला तरी महाराजांनी हातानी रस काढला आणि सर्वांना प्यायला दिला. महाराजांच्या आशीर्वादाने अनेक वर्षे संतती नसणाऱ्या खंडू पाटलाला पुत्ररत्न प्राप्त झाले. जानरावाचा आजार महाराजांचे तीर्थ घेऊन करून बरा झाला, तर कारंजाच्या लक्ष्मण घुडेंनी महाराजांनी दिलेला आंबा खाल्यावर त्यांची व्याधी दूर झाली. प्लेगची साथ आली असताना प्लेगची लागण झालेल्या पुंडलीक भोकरेच्या काखेत महाराजांनी आपला अंगठा लावताच सुधारणा व्हायला लागली आणि पुंडलीक दोन दिवसात बरा झाला. पुंडलीक भोकरे सारख्या निस्सिम सेवक भक्ताला आपल्या पादुका दिल्या. बाळापूरला समर्थ रामदास परम भक्त बाळकृष्ण आणि पुतळाबाईना श्रींनी समर्थांच्या स्वरूपात दर्शन दिले. अमरावतीच्या गणेशआप्पा नावाच्या गरीब भक्तास महाराजांनी त्याच्या घरी जाऊन त्याला भेट दिली. पंढरपूरला बापुना काळेंना आषाढी एकादशीच्या दिवशी विठ्ठलाचे रूप धारण करून दर्शन घडवले.

सोमवती अमावस्येला काही भक्तांसमवेत श्री महाराज नर्मदास्नानासाठी व ओंकारेश्वर दर्शनासाठी गेले होते. नर्मदेच्या जलप्रवासात नावेत पाणी शिरले. तेव्हा महाराजांच्या कृपेने नर्मदेने एका कोळिणीचे रूप धारण करून नाव काठास लावली व त्यांना वाचविले. बंडू तात्याला गुप्त धनाची वर्दी देऊन त्याला आत्महत्या करण्यापासून परावृत्त केले. श्रींनी सुकलालच्या व्दाड गाईला शांत केले, ब्रह्मगिरी पंडित आपले ज्ञान पाजळायला लागल्यावर पेटलेल्या पलंगावर बसून महाराजांनी गोसाव्यास त्याच पलंगावर बसायला सांगितले. भयभीत झालेल्या ब्रह्मगिरीचे गर्वहरण झाले. शिवजयंतीच्या प्रीत्यर्थ भरवलेल्या सभेत लोकमान्य टिळक आणि श्री गजानन महाराज एकत्र आले. त्या सभेत महाराजांनी असे भाकीत वर्तवले की लोकमान्यांना कारावास भोगावा लागेल आणि प्रत्यक्षात खरंच लोकमान्यांना मंडालेच्या तुरूंगात जावे लागले. तेथे ‘गितारहस्य‘ हा ग्रंथ लिहिला गेला.

या सर्व घटनाव्यतिरीक्त कुष्ठरोग बरा होणे, भाकरी प्रसादाने महान कामगिरी होणे. स्त्रियांच्या डब्यातून रेल्वेप्रवास करणे, मृत कुत्रा जिवंत होणे,परमहंस रुपात दर्शन देणे, अशा लिलांव्दारे महाराजांची थोरवी सर्वांना जाणवली होती.

**श्री गजाननविजय ग्रंथाचा अध्याय भक्तिपूर्वक वाचून त्याची प्रचिती अनेक भक्त वाचकांस आली आहे, त्याप्रमाणे त्याचा फायदा होतो.....तो असा....**

अध्याय १- निराशा, मन:शांती, कर्जमुक्ती, नवीन उपक्रमाची सुरुवात,अध्याय २ कुटुंबातील व्यथा आणि अडचणी,अध्याय ३- दुसर्याचे मन जाणतेपणी किंवा अजाणतेपणी दुखावल्या गेले असेल तर, कुणी जवळचे आजारी असेल आणि डॉक्टरांनी हात टेकले असतील तर,

अध्याय ४- जीवनातील दुख आणि समस्या कमी करण्यासाठी, अध्याय ५- दुष्काळ, पाण्याची समस्या, तहान लागलेली असेल व पाणि जवळ नसेल तर, गेलेली संपत्ती परत येईल, जीवनात सकारात्मक बदल होईल, अध्याय ६-चांगले विश्वासू मित्र मिळतील, चांगल्या वाईट मधील फरक कळेल, अध्याय ७- निरर्थक अभिमान आणि अहंकार दूर होईल, इच्छुकांना संतान प्राप्ती होईल, अध्याय ८- कायदे विषयक समस्या दूर होतील आणि कोर्ट केसेस मध्ये विजय मिळेल, अहंकारी व्यक्तींचा अहंकार दूर होईल. अध्याय ९- हट्टी दुराग्रही मित्रांचा प्रभाव कमी होईल शत्रूंचा नाश होईल, चुकांची दुरुस्ती होईल किंवा त्यांचा परिणाम कमी होईल, महाराजांचे कुठल्या तरी स्वरुपात किंवा स्वप्नात दर्शन होईल (जर वार्धक्यामुळे किंवा आजारामुळे शेगावला तुम्ही जाऊ शकत नसाल) अध्याय १० -आपल्या विरोधात कटकारस्थान करणाऱ्याची शक्ती-प्रभाव कमी करण्यासाठी आजारपणातून लवकर ठीक होण्यासाठी, अध्याय ११- ध्येयप्राप्ती आणि अन्याय दूर होऊन न्याय मिळावा ह्यासाठी, स्वरक्षण होण्यासाठी, अपघात किंवा संकटातून वाचलो असल्यास महाराजांचे आभार मानण्यासाठी, अध्याय १२- आपल्या धंद्यात, उद्योगात, शेतीत चांगले उत्पादन, धनधान्य उत्पन्न होण्यासाठी, चांगल्या कार्यात यशप्राप्तीसाठी, अध्याय १३- कर्करोग अथवा तत्सम रोगांपासून मुक्तीसाठी, महापूर, वादळ, अग्नी इत्यादि नैसर्गिक आपत्ती-संकटापासून रक्षण होण्यासाठी, त्याचा प्रभाव कमी होण्यासाठी, अध्याय १४- अचानक सांपत्तिक-आर्थिक हानी झाली असल्यास, अनभिज्ञ संकटांपासून रक्षणा साठी, नदी-पाण्याच्या धोक्यापासून मुक्ती, अध्याय १५- आपल्या कार्यक्षेत्रात स्वतःची ओळख आणि भरपूर प्रसिद्धीसाठी

काम क्रोध मत्सर लोभ आदि पासून दूर राहण्यासाठी

नोकरी मिळवण्यासाठी, प्रमोशन मिळण्यासाठी, पगार वाढीसाठी असहनशील व्यक्तींनी सहनशीलता अंगी येण्यासाठी, अध्याय १६- खूप मोठे ध्येय प्राप्त करण्यासाठी अति तीव्र डोकेदुखीचा त्रास होत असल्यास,

अध्याय १७- खोट्या-चुकीच्या आरोपातून मुक्तता दुसर्याकडून मत्सर आणि तत्सम संकटांपासून मुक्ती, अध्याय १८- खोट्या आरोपातून मुक्तता. तीर्थ अंगारा गेऊन ह्या अध्यायाचे वाचन केल्यास शारीरिक व्याधी दूर होतील. इष्ट देवतेचे दर्शन होईल, अध्याय १९- विवाह योग्य मुलामुलींना मनायोग्य जीवनसाथी मिळेल,

स्वकष्ट व स्वसामर्थ्यावर विश्वास असणाऱ्या भक्तांना काही कारणाने प्रमोशन मिळत नसेल प्रगती होत नसेल तर त्यांची प्रगती होईल, अध्याय २०- विवाहित जीवनात सफलता मिळेल, उद्योग धंद्यात झालेले नुकसान भरून निघेल, प्रकृती स्वास्थ्य लाभेल,अध्याय २१-

मन:शांती, आरोग्य, सुखसमृद्धी आणि मानसिक समाधानासाठी वाचावा.

एकविसावा अध्याय हा कळसाध्याय म्हणतात तो संपूर्ण पोथीचे सार आहे.

गजानन विजय ग्रंथाचे पारायण साधारणपणे दशमी-एकादशी- द्वादशी- या तिथीला करतात. गुरुपुष्यामृत योगावर एक दिवसीय पारायण करणे अतिशय फलदायी ठरते. वर्षातून एकदा तरी शेगावला जाऊन श्री महाराजांचे दर्शन घ्यावे, तसेच वर्षभरात गजानन विजय ग्रंथाचा एक पाठ तरी करावा, महिन्यात गजानन प्रार्थना स्तोत्र तरी वाचावे, दर गुरुवारी गजानन बावन्नी म्हणावी. महाराजांना झुणका, भाकर, ठेचा, कांदा, अंबाडीची भाजी याचा नैवेद्य प्रिय आहे तो दाखववावा.

आज अनेक ठिकाणी गजानन महाराजांची मंदिरातून उपासना कार्य सुरू असते. गजानन महाराज शेगाव संस्थानाचे श्री त्रंबकेश्वर, श्री ओंकारेश्वर, आळंदी, पंढरपूर, याठिकाणी मंदिरे व धर्मशाळा आहेत. तसेच महाराष्ट्रात पुसद, नागपूर, पुणे, जळगाव, भुसावळ, एरंडोल, मुंबई, छ.संभाजीनगर, नासिक, गोळेगाव, जन्मस्थान संस्थान म्हणून ओळखले जाणारे मु.पो. थळ- तालुका मोताळा जिल्हा बुलढाणा, मध्य प्रदेशात इंदोर, भोपाळ, ठिकाणी मंदिरे आहेत. अजूनही असंख्य ठिकाणी मंदिर आहेत.परदेशातही अनेक ठिकाणी मंदिर आहेत.

ऋषिपंचमीला श्रीमहाराजांनी समाधि घेतली त्यावेळी भक्तजनांना आपल्या दुःखाचा आवेग आवरणे खूप कठीण होते. महाराजांनी त्यांना धीर देऊन सांगितले... तुम्ही यत्किंचितही दुःख करू नका. तुम्हाला सांभाळण्या साठी मी येथेच आहे, आणि तुमचा विसर मला पडणे कधीच शक्य नाही. मी गेलो आहे असं समजू नका, आणि कधी भक्तित अंतर करू नका. मला विसरू नका. मी येथेच आहे...

**दु:ख न करावे यत्किंचित। आम्ही आहो येथे स्थित।**
**तुम्हा सांभाळण्याप्रती सत्य। तुमचा विसर पडणे नसे।।**
**मी गेलो ऐसे मानू नका । भक्तीत अंतर करू नका ।**
**कदा मजलागी विसरू नका। मी आहे येथेच।।**
**ऐसे भाषण करुन । योगें रोधिला असे प्राण ।**
**दिला मस्तकी ठेवून । त्या महात्म्या पुरुषाने ।।**

श्री गजानन महाराज संस्थान.शेगांवचे वतीने अनेक सामाजिक सेवा, शैक्षणिक, आरोग्यविषयक, धार्मिक सेवाकार्य, अव्याहतपणे सुरू आहे. प्रासंगिक उद्भवणाऱ्या अडीअडचणीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदतही केली जाते. संस्थानात असणारे सेवक निस्वार्थीपणे, कुठल्याही प्रकारचे प्रलोभनाला बळी न पडता आपले कार्य महाराजांचे चरणी अर्पण करतोय या भावनेने करत असतात. भक्तांसाठी निवास व वाहनाची सोय संस्थानच्या वतीने केली आहे, स्वच्छता आहे, अतिशय शिस्तबद्ध वातावरण आहे. तसेच संस्थानाचा पारदर्शी व्यवहार वाखाणण्यासारखा आहे.

महराष्ट्रात, तसेच मध्यप्रदेशात, परदेशातही लंडन. अमेरिकेत काही ठिकाणी गजानन महाराजांचा प्रगट दिन भक्ती भावाने साजरा केला जातो.

आपण सर्वांनी आपल्या परीने महाराजांच्या चरणी आपली सेवा रुजू करत जावी. श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण करून मन:शांती मिळावावी. महाराजांचा आशिर्वाद घ्यावा.

**तूर्त एवढेच-**

**।। श्री गजानन जय गजानन ।।**
**।। गण गण गणात बोते ।।**

# इन्फॉर्मेशन इज पावर!



सर्वात शक्तिशाली व्यक्ती कोण? ज्याच्याजवळ अफाट धनसंपदा व जमीनजुमला आहे तो, की ज्याच्या शरीरात अफाट ताकद आहे तो, की जो सर्वात बुद्धिमान आहे तो, की ज्याच्याजवळ सर्व राजकीय शक्ती एकवटलेली आहे तो? खरंतर शक्तिशाली व्यक्ती याचा व्यापक अर्थ समजून घेतला पाहिजे.

आजच्या घडीला सर्वच क्षेत्रांत प्रगती साधणारा व्यक्ती खऱ्या अर्थाने शक्तिशाली ठरतो. ही प्रगती वैचारिक, सामाजिक, आर्थिक, शारीरिक व राजकीय अशा सर्व अंगांनी झालेली असावी. अशी सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी माहितीचा खजिना असणे अत्यावश्यक आहे. आजचे युग हे माहिती-तंत्रज्ञानाचे युग आहे. आज माहिती मिळवणे अत्यंत सोपे झाले आहे. त्याचबरोबर मिळालेल्या माहितीचा जीवनातील प्रत्येक टप्प्यावर योग्य उपयोग करता येणेही तितकेच महत्त्वाचे बनले आहे.

ज्याच्याजवळ विविध क्षेत्रांतील भरपूर व अचूक माहिती आहे, तो व्यक्ती जीवनात प्रगती साधू शकतो आणि सर्व आघाड्यांवर यश मिळवू शकतो. पैसा कमावण्यापेक्षा माहिती कमवणे हेच आजच्या काळात शक्तिशाली बनण्याचे गमक आहे आणि तेच सुखी जीवन जगण्याचा पाया देखील आहे.

एखाद्या व्यक्तीने आरोग्याबाबत विपुल माहिती विविध माध्यमांतून जसे की पुस्तके, वृत्तपत्रे, नियतकालिके व इंटरनेट मिळवली असेल, तर त्याला स्वतःच्या तसेच कुटुंबातील इतर सदस्यांच्या आरोग्याबाबत योग्य उपाययोजना करणे सोपे जाते. असा व्यक्ती निरोगी दिनचर्या अंगीकारतो. आहाराबाबत शास्त्रीय दृष्टिकोन बाळगून समतोल आहारावर भर देतो. आजाराची लक्षणे दिसताच योग्य तपासण्या करतो. शारीरिक हालचालींसाठी एरोबिक, मसल गेन इत्यादी व्यायामपद्धतींची माहिती असल्यामुळे तो सुदृढ शरीरयष्टी कमवू शकतो. प्रशासकीय माहिती असल्यास शासकीय कामे वेळेत व सफाईदारपणे करता येतात. राजकीय माहितीमुळे व्यक्ती आपली ठोस राजकीय भूमिका तयार करू शकतो. अश्मयुगीन मानवी जीवनापासून आधुनिक काळापर्यंतच्या इतिहासाची माहिती असणाऱ्याला शहाणपण लवकर येते. इतिहासातून पराभव, संकटे, मानवी प्रगती व सामाजिक भान यांसारख्या अनेक गोष्टी समजण्यास मदत होते. भौगोलिक माहितीमुळे शेती, दळणवळण, हवामान इत्यादींबाबत योग्य भान येते. राज्यघटना, कायदे व कलमे यांची माहिती असणारा व्यक्ती अधिक सक्षमपणे जीवन जगू शकतो. हक्क व कर्तव्यांची जाणीव असल्यामुळे तो एक आदर्श व चारित्र्यवान नागरिक ठरतो. अध्यात्मिक माहितीमुळे मनःशांती, आत्मभान व जीवनातील जाणिवा विकसित होतात. त्यामुळे माणूस उच्च पातळीवर पोहोचतो. मानसशास्त्रातील विविध संकल्पनांची माहिती असल्यामुळे इतरांच्या मनोवृत्ती समजून घेणे व माणसांची पारख करणे सोपे होते. अर्थशास्त्र व आर्थिक साक्षरतेची पुरेशी माहिती असणाऱ्या व्यक्तीचे आर्थिक शोषण होऊ शकत नाही. स्वतःच्या पैशाचा योग्य विनियोग करण्याची क्षमता त्याच्यात निर्माण होते. उद्योग सुरू करण्यापूर्वी त्या उद्योगाची सखोल माहिती घेतल्यास अपयशाची शक्यता कमी होते.

अशा प्रकारे जीवनाच्या विविध क्षेत्रांतील माहिती असणाऱ्या व्यक्तीकडे परिस्थितीवर, लोकांवर व संसाधनांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता निर्माण होते. ज्याच्याजवळ अचूक व पुरेशी माहिती असते, तो व्यक्ती परिस्थिती समजून योग्य निर्णय घेऊ शकतो. माहितीअभावी घेतलेले निर्णय अनेकदा चुकीचे ठरतात.

तथापि, काही माहिती समाजविघातकही असते. बॉम्ब बनवणे, सायबर फसवणूक करणे किंवा लोकांवर अधिराज्य गाजवण्याच्या गोष्टी यांसारख्या माहितीतून एखादी व्यक्ती समाजासाठी उपद्रवी ठरू शकते. याउलट समाजासाठी उपयुक्त माहिती बाळगणारा व्यक्ती लोकांचा मसीहा ठरतो. नैसर्गिक व इतर आपत्तींच्या वेळी आपत्ती व्यवस्थापनाची माहिती असणारा अनेकांसाठी देवदूत ठरतो.(कार्यालयातील अग्निशमन यंत्र (सिलेंडर) कसे वापरायचे याची साधी माहितीही अनेकांना नसते.)

आपल्या जवळ असलेली योग्य माहिती इतरांना देत राहणे ही देखील एक समाजसेवाच आहे. चुकीची माहिती पसरवणे हा समाजद्रोहच आहे. मीच सर्वज्ञ आहे असा आव न आणता योग्य मार्गदर्शन करणे हेच खरे शहाणपण आहे.

माहिती ही केवळ ज्ञान नसून ती व्यक्तीला सक्षम, जागरूक व सामर्थ्यवान बनवते. म्हणूनच Information is Power हे विधान पूर्णतः सत्य आहे.

## डॉ. गोपाल मुंधडा यांचे मरणोत्तर नेत्रदान



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** चंद्रपुरातील सह्दय व्यक्तिमत्व असलेले प्रसिध्द बालरोगतज्ज्ञ, चंद्रपूर बचाव संघर्ष समितीचे संस्थापक डॉ. गोपाल मुंधडा यांचे काल पहाटे ह्दयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणारे डॉ. गोपाल मुंधडा यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले.

उतारवयातही तरुणांना लाजवेल असे कार्य करणारे डॉ. मुंधडा यांच्या निधनाने चंद्रपुरातील वैद्यकीय क्षेत्रासोबतच सामाजिक व राजकीय क्षेत्रात शोककळा पसरली. चंद्रपूरचा प्रदूषणावर असो की, चंद्रपूरातील जटपूरा गेटवर होणारी वाहतूक कोंडीचा विषय असो यावर लोकप्रतिनिधीपासून तर प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पाठपुरावा करुन तो प्रश्न सोडविण्यासाठी सदैव झटणारे सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांची चंद्रपुरात ओळख होती. शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी त्यांनी आरोग्य विभागाच्या सहकार्याने उपक्रम राबविले. चंद्रपूर शहर सुंदर दिसावे म्हणून स्वच्छता मोहीम राबविली. लोकांच्या चेहऱ्यावर सदैव हास्य फुलत राहावे यासाठी त्यानी सुरु केलेला बँक ऑफ हॅपिनेस नावाचा उपक्रम शहरात चांगलाच प्रसिध्दीझोतात आला होता.

## रमाई कथा

डोळ्यां येती आसवे
अशी रमाईची कथा
अव्याहत वाहत राहे
आठवणींचा रे जथा

बनली भक्कमचाके
सांभाळी संसार रथा
भिमराव देऊ शकले
संविधान देन भारता

बाबांचे शिक्षणास्तव
खाल्या सतत खस्ता
बॅरिस्टर हो भिमराव
जगता दाखवी रस्ता

त्याग मूर्ती अ द्वितीय
पाठीशी उभी असता
अल्पायुत विझेज्योत
दीर्घ कष्टांस उपसता

परदेशीबाबासाहेबांस
जाणवे रामू ची व्यथा
नीळसूर्य लाभे जगता
बलिदान न गेले वृथा

इतिहास दाखले देता
अजरामर गाई गाथा
दिव्य जोडप्या चरणी
सादरे झुकवतो माथा

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वाढदिवस साजरा करणार नाही

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे महाराष्ट्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यामुळे यंदा दिनांक ०९ फेब्रुवारी रोजी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. पुष्पगुच्छ, भेटी आणू नयेत, शुभेच्छा देणारे होर्डिंग्ज लावू नये, तसेच वाढदिवसानिमित्ताने कोणताही सोहळा आयोजित करू नये, असे आवाहन एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

अजित दादांच्या अकाली जाण्याच्या वेदनेतून महाराष्ट्र आजही सावरलेला नाही. व्यक्तिशः मी माझा सहकारी आणि मित्र गमावला आहे. दादांच्या निधनाने झालेली अपरिमित हानी भरून येणारी नाही. पवार कुटुंबाच्या दुःखात आपण सहभागी आहोत. अशा या दुःखद परिस्थितीत वाढदिवस साजरा करणे, सोहळे-समारंभ करणे मला उचित वाटत नाही. त्यामुळेच परिस्थितीचे गांभीर्य आपण जपू या असे आवाहन शिंदे यांनी केले आहे. माझ्या वाढदिवसानिमित्ताने कुणीही पुष्पगुच्छ आणू नयेत, होर्डिंग्स लावू नयेत, तसेच कोणताही समारंभ, कार्यक्रम आयोजित करू नयेत, अशी विनंती उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली आहे.

## जिल्हा कारागृह येथे सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पाचे लोकार्पण




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्हा कारागृह वर्ग - १ येथे चंद्रपूर जिल्हा नियोजन समितीच्या स्थानिक निधीतून मंजूर करण्यात आलेल्या सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पाचे लोकार्पण जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते करण्यात आले. चंद्रपूर जिल्हा कारागृह वर्ग - १ येथे बंद्यांच्या दैनंदिन वापरातून निर्माण होणाऱ्या अंदाजे १ लक्ष लीटर सांडपाण्याची साठवणूक होत होती. दि.१९ ऑगस्ट २०२४ रोजी कारागृहात आयोजित अभिविक्षक मंडळाच्या बैठकीत कारागृहातील सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प राबविण्याबाबत जिल्हाधिका यांनी निर्देश दिले. सदर प्रकल्प कार्यान्वित झाल्याने चंद्रपूर जिल्हा कारागृह वर्ग-१ येथे प्रतिदिन निर्माण होणारे सुमारे १ लक्ष लीटर सांडपाणी शुध्द करण्यात येणार असून, शुध्द पाण्याचा कारागृह परिसरातील झाडे व हरित क्षेत्राच्या सिंचनासाठी पुनर्वापर करण्यात येणार आहे. यामुळे नवीन पाण्यावरील अवलंबित्व कमी होणार आहे. सांडपाणी थेट बाहेर सोडले जात नसल्याने भूजल प्रदूषणास प्रतिबंध, तसेच परिसरातील दुर्गंधी, डास व रोगराई कमी होण्यास मदत होणार असून, कारागृहातील बंदी व कर्मचारी यांच्यासाठी स्वच्छ व आरोग्यदायी वातावरणाची निर्मिती होणार आहे. सदर प्रकल्पासाठी जिल्हा नियोजन समितीद्वारे रुपये १.०५ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला होता. या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येऊन मे. लाईफफर्स्ट कॉनसेप्ट्स ॲण्ड टेक्नॉलॉजीज प्रा. लि. पुणे यांना काम मंजूर करण्यात आले. या प्रकल्पाची क्षमता १०० (१ लक्ष लिटर प्रतिदिन) इतकी आहे.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, आयुक्त अकुनूरी नरेश भा.प्र.से., शहर अभियंता रविंद्र हजारे, सहाय्यक अभियंता सोनू प्रकाशराव थूल, कारागृह अधिक्षक अनुपकुमार कुमरे, सतीश सोनवणे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, तसेच कारागृहातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी तुरुंगाधिकारी प्रकाश लोमटे, लिपिक विजय माल्टे, रुपेश रोकडे, समील गणवीर, सुभेदार शिवशंकर खंदारे, हवालदार नरेंद्र दशमवार, कारागृह शिपाई स्वप्नील भोयर, विरेंद्र श्रीरामे, विजय कुहीरे, तसेच महिला कर्मचारी मिना मडावी, पुष्पा मुसमाडे, प्रिया तलांडे, प्राची तेलंग, चंदा नेवारे यांनी मोलाचे सहकार्य केले.

## त्यागमुर्ती माता रमाई; महामानवाच्या महाप्रवासातील अविभाज्य सावली



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, विंचूर (नाशिक) :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नावाचा सूर्य जेव्हा जगाच्या क्षितिजा वर तळपत होता, तेव्हा त्या सूर्याला आपल्या त्यागाच्या समिधेने तेजोमय ठेवणारी शक्ती म्हणजे माता रमाई. ७ फेब्रुवारी १८९८ रोजी दापोलीतील वणंदगाव येथे जन्मलेल्या रमाईंचा आज १२८ वा जन्मदिवस. त्या निमित्ताने त्यांच्या उत्तुंग जीवनाचा हा विशेष मागोवा.

**बालपण आणि विवाह :-** रमाईंचे बालपण अत्यंत कष्टात गेले. लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरपल्यामुळे त्या भावंडांसह मामाकडे मुंबईत आल्या. वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षी, १९०७ मध्ये त्यांचा विवाह भीमराव आंबेडकरांशी झाला. रामजी सुभेदारांची लाडकी सून आणि भीमरावांची 'रामू' म्हणून त्यांनी संसारात पाऊल ठेवले.

**हलाखीचा संसार आणि असीम त्याग :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा शिक्षणासाठी परदेशात होते. तेव्हा रमाईंनी मरणयातना सोसून संसार सांभाळला. 'प्रत्येक यशस्वी पुरुषाम ागे एका स्त्रीचा हात असतो', हे वाक्य रमाईंच्या बाबतीत तंतोतंत खरे ठरते. **दैनिक संघर्ष :-** शेणाच्या गोवऱ्या थापून, त्या विकून आलेले पैसे त्यांनी संसारासाठी आणि बाबासाहेबांच्या शिक्षणासाठी जपले. मातृत्वाचे दुःख: एका आईसाठी आपल्या मुलाला डोळ्यादेखत मृत्यूच्या दारात जाताना पाहणे हे जगातील सर्वात मोठे दुःख असते. रम ाईंची मुले औषधाविना दगावली, तरीही त्यांनी बाबासाहेबांच्या ध्येयपूर्ती कधीही अडथळा आणला नाही.

**स्वाभिमानी जीवन :-** शेजारच्या महिलांनी दागिन्यांवरून हिणवले असता, त्या म्हणत, माझा खरा दागिना म्हणजे माझे कुंकू, ज्याची ख्याती साऱ्या विश्वात आहे.समर्पित सहचारिणीएका बाजूला बॅरिस्टर पती आणि दुसऱ्या बाजूला अंगावर साधे लुगडे नसलेली पत्नी, असा तो काळ होता. सत्कार समारंभात जाण्यासाठी चांगले वस्त्र नव्हते, तेव्हा बाबासाहेबांना मिळालेला फेटा नेसून त्यांनी गरिबीचा सन्मान राखला. बाबासाहेबांच्या आग्रहाखातर त्या लिहायला-वाचायला शिकल्या आणि पुढे स्त्रियांच्या सभा घेऊन त्यांना दलित चळवळीत सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. नवे पंढरपूर घडवणारी शक्तीजेव्हा रमाईंनी पंढरपूरला जाण्याचा हट्ट केला, तेव्हा बाबासाहेबांनी त्यांना सांगितले की, जिथे आपल्याला सन्मान नाही तिथे जाण्यापेक्षा आपण सेवेतून 'दुसरे पंढरपूर' निर्माण करू. आज महू, चैत्यभूमी, येवला आणि दीक्षाभूमीच्या रूपाने ते वैचारिक पंढरपूर डौलाने उभे आहे.

**निष्कर्ष :-** रमाई केवळ पत्नी नव्हत्या, तर त्या शोषितांच्या आई आणि त्यागाची मूर्ती होत्या. त्यांच्या शोषिक वृत्तीमुळेच 'भिवाचा भीमराव' आणि पुढे 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर' घडू शकले. आज आपण जे सन्मानाचे आयुष्य जगत आहोत, त्यात माता रमाईंच्या बलिदानाचा फार मोठा वाटा आहे. त्यागमुर्ती माता रमाई यांच्या १२८ व्या जयंती निमित्त त्यांच्या पावन स्मृतीस कोटी कोटी प्रणाम!

**लेखक :** प्रकाश संगिता नंदकुमार निकाळे (कविराज), **स्थळ :** क्रांतिभूमी विंचूर

# संगमनेरमध्ये कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

## ३ आरोपींविरुद्ध गुन्हा, ५.५३ लाखांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०६, संगमनेर (अहिल्यानगर) :** संगमनेर शहरातील जमजम कॉलनी परिसरात गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर कत्तल करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेने पुन्हा एकदा धडक कारवाई करत तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून ५ लाख ५३ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अहिल्यानगर सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर कत्तल व गोमांस विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि. महादेव गुट्टे तसेच पोलीस अंमलदार गणेश धोत्रे, विजय पवार, बाळासाहेब गुंजाळ, योगेश कर्डीले व अरुण मोरे यांचे पथक तयार करून संगमनेर शहरात कारवाईसाठी रवाना करण्यात आले.

दि.०६ फेब्रुवारी रोजी पहाटे गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार जमजम कॉलनी, गल्ली क्रम ांक ९ येथे मोहीद्दीन कुरेशी हा आपल्या साथीदारांसह गोवंशीय जनावरांची कत्तल करत असल्याचे समजताच पथकाने तात्काळ छापा टाकला. यावेळी काही इसम अंधाराचा फायदा घेत पळून गेले.

कारवाईदरम्यान साहेब मोहीद्दीन कुरेशी (वय २३, रा. गल्ली क्र. ८, जमजम कॉलनी, संगमनेर) यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार साहील उर्फ साद मुस्ताक कुरेशी (रा. जमजम कॉलनी, संगमनेर) व अयान महेबुब कुरेशी (रा. मदीनानगर, ता. संगमनेर) हे आरोपी फरार असल्याचे समोर आले आहे.

सदर ठिकाणावरून ४ लाख ५० हजार रुपये किमतीचे सुमारे १५०० किलो गोमांस, १ लाख रुपये किमतीची दोन जिवंत गोवंशीय जनावरे, ३ हजार रुपये किमतीचा इलेक्ट्रिक वजनकाटा व ३०० रुपये किमतीचे दोन लोखंडी सुरे असा एकूण ५ लाख ५३ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १२७/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, ३२५, ३(५) तसेच महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९९५ (सुधारित २०१५) चे कलम ५(ब), ५(क), ९, ९(अ) व प्राण्यांशी निर्दयतेने वागणुकीसंबंधी कलम ३, ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करीत आहेत. सदर कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# डेटा संरक्षण आणि पारदर्शकता यांचा समतोल आवश्यक - मुख्य सचिव अग्रवाल

## डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र सज्ज




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, पुणे :** डेटा संरक्षण आणि प्रशासनातील पारदर्शकता यांचा समतोल राखणे आवश्यक असून, नागरिकांचा त्यांच्या डेटावर हक्क आणि नियंत्रण असणे ही लोकशाहीची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले. डिजिटल युगात नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण, सायबर सुरक्षा आणि जबाबदार प्रशासन अधिक बळकट करण्याच्या दिशेने महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्यावतीने डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण (Digital Personal Data Protection) कायदा (DPDP Act), २०२३ आणि त्यासंदर्भातील नियमांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे उच्चस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पोलिस अधिकारी, कायदेतज्ज्ञ, तंत्रज्ञान व गोपनीयता क्षेत्रातील जाणकारांनी सहभाग घेतला.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सायबर सुरक्षा, डेटा मालकी हक्क आणि डेटा संरक्षण यांचे महत्त्व अधोरेखित केले. DPDP कायद्याच्या अंम लबजावणीनंतर कोणतीही डेटा गळती थेट दंडात्मक कारवाईस कारणीभूत ठरू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

मजबूत संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज - प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी DPDP कायद्यामुळे डेटा संकलन, साठवण आणि वापराची पद्धत बदलावी लागेल, असे सांगितले. अनेक प्रणाली गरजेपेक्षा जास्त डेटा गोळा करतात, याकडे लक्ष वेधत त्यांनी जुन्या डेटाबेसचे पुनरावलोकन, डेटा इम्पॅक्ट असेसमेंट आणि मजबूत संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज अधोरेखित केली. विशेषतः मुले, महिला आणि असुरक्षित घटकांच्या डेटाबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जबाबदार डेटा व्यवस्थापन पद्धतीवर भर - सचिव विरेंद्र सिंह

माहिती तंत्रज्ञान सचिव विरेंद्र सिंह म्हणाले की, आरोग्य, शिक्षण, सामाजिक कल्याण, आर्थिक समावेशन यांसारख्या क्षेत्रांत वाढलेल्या डिजिटल सेवांमुळे नागरिकांची वैयक्तिक माहिती, त्याचे संरक्षण आणि योग्य वापर ही महत्त्वाची जबाबदारी बनली आहे. DPDP कायदा हा शासन संस्थांच्या कार्यपद्धतीत मूलभूत बदल घडवणारा आहे. नागरिकांचा विश्वास ही सार्वजनिक प्रशासनाची खरी ताकद आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाने पारदर्शक, नैतिक आणि जबाबदार डेटा व्यवस्थापन पद्धती स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

गोपनीयतेचा मूलभूत अधिकार - ॲड. खुशबू जैन

ॲड. खुशबू जैन यांनी DPDP कायद्याची घटनात्मक पार्श्वभूमी स्पष्ट करताना गोपनीयतेचा अधिकार हा म ूलभूत अधिकार असल्याचे सांगितले. वैयक्तिक माहिती संमतीशिवाय संकलित करता येणार नाही, तसेच नागरिकांना त्यांच्या डेटाची माहिती, प्रवेश, संमती मागे घेणे व डेटा हटविण्याचा अधिकार असल्याचे त्यांनी नमूद केले.

लेगॅसिस टीमच्या सादरीकरणात DPDP कायद्याच्या प्रमुख तरतुदी, डेटा संरक्षण मंडळ, डेटा फिड्युशरी, डेटा प्रिन्सिपल, कन्सेंट मॅनेजर आणि डेटा संरक्षण अधिकारी (DPO) यांच्या भूमि का स्पष्ट करण्यात आल्या. डेटा उल्लंघन झाल्यास जबाबदारी केवळ विक्रेत्यांची नसून संबंधित अधिकारी यांची ही असल्याचे अधोरेखित करण्यात आले. कार्यशाळेला भारतीय प्रशासकीय सेवा व भारतीय पोलीस सेवेतील तसेच म हाआयटीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## शेतकरी संघटना कोरपना तालुक्याच्या वतीने नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, कोरपना (चंद्रपूर) :** शेतकरी संघटना, कोरपना तालुक्याच्या वतीने दिनांक ०६ फ ेब्रुवारी २०२६ रोजी ओम भवन, कोरपना येथे दुपारी ०१ वाजता गडचांदूर नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष निलेश ताजने यांच्यासह गडचांदूर नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक अश्विनी कांबळे, सारिका डोर्लीकर, महेश आवारी यांचा तसेच राजुरा नगरपरिषदेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष दिलीप देरकर, स्थायी समिती अध्यक्ष रमेश नळे, नवनिर्वाचित नगरसेवक स्वप्नील मोहुर्ले, जुबेर शेख व स्वीकृत नगरसेवक किशोर हिंगाने यांचा सत्कार समारंभ पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. वामनराव चटप होते. तर मधुसूदन हरणे (स्व. भा.प.प्र.अध्यक्ष), सतीश दानी (यु.आ.माजी प्रदेशाध्यक्ष), अरुण नवले (शे. स. जि.अ.), निळकंठ पा. कोरांगे (स्व.भा.प.जि.अ.), ॲड. श्रीनिवास मुसळे (ता. अ.शे.स.), ॲड. दीपक चटप (प्र.यु.आ.), रमाकांत पा.मालेकर, सुनील बावणे (जि.उ.शे.स.), रवी गोखरे (माजी प.स.सभापती), नरेश सातपुते (ता.अ.यु. आ.), गणपत काळे, प्रवीण गुंडावार व अनिल कौरासे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व.धनराज गोटे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सत्कार समारंभास सुरुवात करण्यात आली. यावेळी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींना शुभेच्छा देत शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन विकासात्मक कामे राबवावीत, असे आवाहन केले.

शहर व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी समन्वयाने कार्य करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांनी शेतकरी संघटनेचे आभार मानत जनतेच्या अपेक्षांनुसार काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. या सत्कार समारंभाला शेतकरी संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विवाह सोहळ्यातील आहेर भेट रक्कम ४२ हजार ३०० रुपये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट




**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०५, कुंडलवाडी (नांदेड) :** दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी हरनाळी येथील मारोती पिराजी जलदेकर यांची कन्या चि.सौ.का.शिवकांता मारोती जलदेकर यांच्या विवाह सोहळा हरनाळी येथे संपन्न झाला. सदरील विवाह सोहळ्यास आलेले आहेर भेट हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरनाळी या शाळेस देण्याचे हे गेल्या आठ दिवस अगोदर मारोती जलदेकर मुलीचे वडील हे शाळेत येऊन मुख्याध्यापक साजीद शेख यांचीशी भेटून माझ्या मुलीच्या विवाहात येणारी आहेर भेट रक्कम हे मी गावच्या शाळेस माझ्या परिवारातर्फे भेट मदत स्वरुपात देणार आहे तरी आपण विवाह सोहळ्यास उपस्थित राहून स्वीकारावे असे सांगण्यात आले असता, आज रोजी विवाह संपन्न होताच जमा झालेली रक्कम हे वधू आणि वर यांच्या हस्ते शालेस भेट देण्यात आले. खरच अश्या दानशूर व्यक्तीची गरज समाजाला आहे हे आजच्या युगात मराठी शाळा फार उपयोगाची ठरणार सदरील कुटुंबाचे समाजाच्या वतीने आणि या गावातील ग्रामस्थ यांच्या कडून सर्वत्र कौतुक होत आहे. सदरील प्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक श्री.शेख साजीद आणि श्री.गुडलावार एस.पी.आभार मांडले.

## चिंचोलीच्या जिल्हा परिषद शाळेला शैक्षणिक साहित्य भेट

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०६, राहुरी (अहिल्यानगर) :** आपल्या आई-वडिलांचे शिक्षण ज्या शाळेत झाले, त्या शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करत पुढील पिढीला गुणवत्तापूर्ण शिक्षण व संस्कार मिळावेत या उदात्त भावनेतून चिंचोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला माजी विद्यार्थ्यांच्या वारसांकडून शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. तालुक्यातील चिंचोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्व. दामोधर बंडूजी लोळगे यांचे प्राथमिक शिक्षण झाले होते. शाळेत मिळालेल्या शिस्त, संस्कार आणि शिक्षणाच्या बळावर त्यांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षण दिले. या शाळेचे ऋण फेडावे, अशी भावना त्यांनी आपल्या कुटुंबीयांकडे नेहमी व्यक्त केली होती. त्यांची ही इच्छा त्यांच्या सुपुत्रांनी पूर्ण करत शाळेला मदतीचा हात दिला. भविष्यातही शैक्षणिक कार्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील अतिवृष्टीबाधित ४३७ विहिरींसाठी ६३ लाखांचा निधी मंजूर

## पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात निधीचे वितरण



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०५, अहिल्यानगर :** सन २०२५-२६ च्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या जिल्ह्यातील ४३७ शेत विहिरींच्या दुरुस्तीसाठी शासनाने ६३ लाख १० हजार ६८३ रुपयांचा निधी मंजूर करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. या मदतीचे वितरण आज पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते ६ शेतकऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात धनादेश देऊन करण्यात आले असून जिल्हाधिकाऱ्यांनी उर्वरित निधीचे वाटप १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

खरीप हंगामात राज्यात व जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी गाळाने बुजल्या होत्या अथवा खचल्या होत्या. यामुळे रब्बी हंगामात पिकांच्या सिंचनासाठी शेतकऱ्यांसमोर मोठी अडचण निर्माण झाली होती. यावर उपाययोजना म्हणून राज्य शासनाच्या नियोजन विभागाने १३ ऑक्टोबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मदत जाहीर केली आहे. या निर्णयान्वये बाधित विहिरींच्या दुरुस्तीसाठी प्रत्यक्ष आलेला खर्च किंवा कमाल ३० हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल, ती मदत म्हणून देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडे गटविकास अधिकाऱ्यांमार्फत प्राप्त झालेल्या अहवालानुसार पहिल्या टप्प्यात ४३७ विहिरी पात्र ठरल्या आहेत. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये या निधीचे वाटप करण्यात येणार आहे. यामध्ये सर्वाधिक फटका बसलेल्या जामखेड तालुक्यातील १२८ विहिरींसाठी १८ लाख ६८ हजार ७८ रुपये, शेवगावमधील १११ विहिरींसाठी १६ लाख ४८ हजार २०६ रुपये, राहुरीतील ४९ विहिरींसाठी ७ लाख ३२ हजार ८४४ रुपये, श्रीरामपूरमधील ४६ विहिरींसाठी ६ लाख ६० हजार ६०३ रुपये, नेवासा येथील ४३ विहिरींसाठी ५ लाख १० हजार ८६४ रुपये, संगमनेरमधील २१ विहिरींसाठी ३ लाख १४ हजार ७६ रुपये, कोपरगावच्या १२ विहिरींसाठी ४ लाख ४ हजार ४०० रुपये व पारनेरच्या १२ विहिरींसाठी १ लाख ७१ हजार ६१२ रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

या निधी वितरण कार्यक्रमाप्रसंगी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी प्रशासनाला गतीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. उर्वरित सर्व पात्र विहिरींचे प्रस्ताव तातडीने सादर करून येत्या १५ फेब्रुवारीपर्यंत सर्व बाधित शेतकऱ्यांना रक्कमेचे वाटप पूर्ण करावे, असे सक्त निर्देश त्यांनी संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत. यावेळी कृषी विभाग, आत्मा, पशुसंवर्धन विभाग व जिल्हा परिषदेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# आ.मुनगंटीवार यांच्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

## १०३ कोटी ८ लाख ६३ हजार ३६१ रुपये धान चुकारे मंजूर



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना आधारभूत किंमत योजनेंतर्गत धानाचे प्रलंबित चुकारे तातडीने मिळावेत, यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना पत्र लिहीले होते. तसेच अन्न व नागरी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव अनिल डिगीकर यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली होती. त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी धान खरेदीचे १०३ कोटी ८ लाख ६३ हजार ३६१ रुपये इतके चुकारे मंजूर करण्यात आले आहेत.

आ. मुनगंटीवार यांनी केलेल्या मागणीची दखल घेत प्रधान सचिवांनी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात धानाच्या चुकाऱ्याची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशनने संबंधित निर्णयाची अधिसूचना जारी केली आहे.

यामध्ये खरीप पणन हंगाम २०२५-२०२६ मधील धानाचे चुकारे देण्यात आले आहे. खरीप पणन हंगाम २०२५-२६ मधील आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत १८ जानेवारी २०२६ पर्यंत एकूण ४,३५,१४७.०५ क्विंटल धान खरेदी करण्यात आली आहे. या खरेदीचे १०३,०८,६३,३६१ रुपये इतके चुकारे शासनाच्या निकषानुसार प्राप्त झाले असून, त्याद्वारे १४,२२९ शेतकऱ्यांना ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात अदा होणार आहे. धान खरेदी होऊनही अनेक शेतकऱ्यांना चुकारे मिळाले नसल्याने शेतकऱ्यांपुढे आर्थिक अडचणी निर्माण झाल्याची बाब आ. मुनगंटीवार यांनी लक्षात आणून दिली होती. त्याचवेळी प्रलंबित रक्कम तातडीने अदा करण्याची मागणी केली. या मागणीला प्रधान सचिवांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता. यासंदर्भात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आ. मुनगंटीवार यांच्याकडे निवेदन दिले होते. या निवेदनाची तातडीने दखल घेत आ. मुनगंटीवार यांनी ना. छगनजी भुजबळ यांना पत्र लिहीले. 'चंद्रपूर जिल्हा हा धान उत्पादक जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात आधारभुत किमतीनुसार ५ डिसेंबर २०२५ पासून प्रत्यक्ष धान खरेदी सुरु झाली. आजपर्यंत २३६९ रुपये प्रती क्विंटल याप्रमाणे ४७४२८६.४६ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली होती. पण शेतकऱ्यांना त्यांनी विकलेल्या धानाचे चुकारे मिळालेले नाहीत,' याकडे आ. मुनगंटीवार यांनी पत्रामधून लक्ष वेधले होते. या पाठपुराव्याची दखल घेत शासनाने चंद्रपूर जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना धानाचे चुकारे मंजूर करण्यात आले असून त्याबद्दल कायम शेतकऱ्याप्रती संवेदनशील असलेले नेते आ. सुधीर मुनगंटीवार यांचे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आभार मानले आहे.

# पनवेल मनपात १० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महापौर व उपमहापौर निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, पनवेल :** महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूक प्रक्रिया मंगळवार, दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. यासाठी पनवेल महानगर पालिकेची विशेष सर्वसाधारण सभा क्रमांक ०१ पीठासीन अधिकारी जिल्हाधिकारी ठाणे डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली ११.०० वाजता पनवेल येथील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आली आहे.

दरम्यान शुक्रवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी पनवेल महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडीसाठी नामनिर्देशन प्रक्रिया महापालिका सचिव नानासाहेब कामठे यांच्या कार्यालयात पूर्ण झाली असून संबंधित पदांसाठी खालीलप्रमाणे उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

**महापौर पदासाठी दाखल उमेदवारी अर्ज :**

१. पाटील नितीन जयाराम
२. अर्चना योगेश भोईर

**उपमहापौर पदासाठी दाखल उमेदवारी अर्ज:**

१. पाटील प्रमिला रवीनाथ
२. लिला रतन कातकरी

या विशेष सर्वसाधारण सभेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९ नुसार महापालिकेच्या विद्यमान सदस्यांमधून महापौर व उपमहापौर पदासाठी अडीच वर्षांच्या कालावधीसाठी निवड करण्यात येणार आहे.



या निवडणूक प्रक्रियेत प्रथम महापौर पदासाठीची प्रक्रिया राबविण्यात येणार असून, त्यानंतर उपमहापौर पदासाठी निवडणूक घेतली जाणार आहे. यामध्ये सुरूवातीस नामनिर्देशन पत्रांची छाननी, वैध उमेदवारांची नावे जाहीर करणे, उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास पीठासीन अधिकाऱ्यांकडे लेखी नोटीस देणे व हात वर करून मतांची नोंद घेणे या सर्व मतदान प्रक्रियेनंतर निकाल जाहीर केला जाणार आहे. महापौर पदाच्या निवडणुकीनंतर लगेचच उपमहापौर पदासाठीची निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

# राहुरीत रॉंग साईड व रंगीत काचा वाहनांवर कारवाई; ६८ वाहनांवर ५० हजारांहून अधिक दंड

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०६, राहुरी (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर ते मनमाड महामार्गाचे काम सुरू असल्याने राहुरी शहरामध्ये सध्या एकेरी वाहतूक सुरू आहे. या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी राहुरी पोलिसांच्या वाहतूक शाखेकडून रॉंग साईडने वाहन चालविणाऱ्या तसेच रंगीत व ब्लॅक काचा असलेल्या वाहनांवर कारवाई करण्यात आली. दिनांक ५ व ६ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत एकूण ६८ वाहनधारकांवर कारवाई करून ५० हजार १५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. यापैकी रंगीत व ब्लॅक काचा असलेल्या २५ वाहनांवर स्वतंत्र कारवाई करून २२ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. महामार्गाचे काम सुरू असल्याने शहरातील वाहतूक मंद गतीने सुरू असताना काही वाहनचालक रॉंग साईडने वाहने चालवत असल्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अशा वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

यावेळी राहुरी पोलीस स्टेशनच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, सर्व वाहनचालकांनी एकेरी वाहतुकीचे नियम पाळावेत, रॉंग साईडने वाहने चालवू नयेत तसेच वाहनांवरील रंगीत व ब्लॅक काचा काढून घ्याव्यात. अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल. सदर कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे (अहिल्यानगर), अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे (श्रीरामपूर), उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर (श्रीरामपूर विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, सहाय्यक फौजदार भाऊसाहेब आव्हाड तसेच पोलीस हवालदार ठोंबरे, दरेकर व फुलमाळी यांनी केली.

# थोडक्यात

## महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त कुष्ठरोग जनजागृती रॅलीचे आयोजन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, अलिबाग (रायगड) :** सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) रायगड - अलिबाग यांच्या वतीने महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी कुष्ठरोग जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था, माणुसकी प्रतिष्ठान व इतर सामाजिक संस्था यांच्या सहयोगाने तसेच कर्मचारी व स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमास जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निशिकांत पाटील, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ.प्राची नेहुलकर (रायगड-अलिबाग), माणुसकी प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. राजाराम हूलवान, जन शिक्षण संस्थान अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, जन शिक्षण संस्थान संचालक डॉ.विजय कोकणे, अवैद्यकीय अधिकारी भगवान जाधव यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, नर्सिंग स्टाफ व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. तसेच उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव या जनजागृती रॅलीमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला.

सदर जनजागृती रॅली सिव्हिल हॉस्पिटल, अलिबाग येथून सुरू करण्यात आली. रॅलीदरम्यान नागरिकांना कुष्ठरोगाबाबत जनजागृती, गैरसमज दूर करणे, वेळेवर तपासणी व उपचाराचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली. नागरिकांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या जनजागृती रॅलीच्या माध्यमातून समाजात कुष्ठरोगाबाबत सकारात्मक संदेश पोहोचविण्यात यश आले.

## ब्रह्माकुमारी लाईट हाऊस सेवा केंद्रात नवनिर्वाचित उपमहापौर देवकर यांचा सत्कार



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०६, सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर तसेच भाजप दक्षिण सोलापूर पश्चिम मंडळ अध्यक्ष महेश देवकर यांनी ब्रह्माकुमारी लाईट हाऊस सेवा केंद्राला सदिच्छा भेट दिली. यावेळी ब्रह्माकुमारी सोलापूर सब-झोनच्या मुख्य संचालिका बी.के. सोमप्रभा दीदी व ब्रह्माकुमारी परिवाराच्या वतीने उपमहापौरपदी निवड झाल्याबद्दल ज्ञानेश्वरी देवकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास ब्रह्माकुमारी लता दीदी यांची ही प्रमुख उपस्थिती लाभली. सत्कारानंतर बोलताना उपमहापौर ज्ञानेश्वरी ताई देवकर यांनी ब्रह्माकुमारी संस्थेद्वारे राबविण्यात येणारे आध्यात्मिक, सामाजिक व नैतिक सेवा उपक्रम समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगितले. भविष्यात संस्थेच्या कार्यात सर्वतोपरी सहकार्य व योगदान देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच आपण दीर्घकाळापासून ब्रह्माकुमारी संस्थेशी आत्मीयतेने जोडल्या गेल्याचेही त्यांनी नमूद केले. याच प्रसंगी उपमहापौर व त्यांच्या परिवाराच्या वतीने बी.के. सोमप्रभा दीदी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच विजापूर नाका पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक मोहन पवार यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम मस्के यांनी केले, तर आभार प्रदर्शन ब्रह्माकुमार बाळू भाई यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम आध्यात्मिकता, सौहार्द व सेवाभावाच्या वातावरणात उत्साहात संपन्न झाला.

## विंचूर विद्यालयात १२ वीच्या विद्यार्थ्यांना भावूक वातावरणात निरोप

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहात आणि भावूक वातावरणात संपन्न झाला. शालेय जीवनाचा टप्पा ओलांडून भविष्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या विद्यार्थ्यांना यावेळी मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य एन.ई.देवढे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की, यशस्वी जीवनासाठी केवळ बुद्धिमत्ता पुरेशी नाही, तर त्याला शिस्त, सातत्यपूर्ण मेहनत आणि नैतिक मूल्यांची जोड असणे आवश्यक आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. छत्रपतींचे विचार अंगीकारण्याचे आवाहन; कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध शिवव्याख्याते प्रवीण वाटोडे यांनी आपल्या पहाडी आवाजात छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य विद्यार्थ्यांसमोर मांडले. महाराजांचे नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य आणि जिद्द यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी जीवनातील आव्हानांना सामोरे जावे, असा संदेश त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून दिला.शिक्षकांचे मार्गदर्शन व विद्यार्थ्यांच्या आठवणी याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख प्रा.टिळेकर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच विषय शिक्षक प्रा. महादेव, प्रा.पवार , प्रा. श्रीमती अहिरे व प्रा. श्रीमती दळवी यांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांच्या गुणांचे कौतुक केले.निरोप घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीही आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाबद्दल आणि संस्कारांबद्दल विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली, ज्यामुळे उपस्थित सर्वच जण काहीसे भावूक झाले होते. नेटके नियोजन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गायकवाड यांनी आपल्या शैलीत केले, तर उपस्थितांचे आभार प्रा.बैरागी यांनी मानले. विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते.

## 'शिवळ' महाविद्यालयात माजी विद्यार्थी विनायक घुडे यांचे व्याख्यान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, शहापूर (ठाणे) :** मुरबाड तालुक्यातील शिवळे महाविद्यालयात माजी विद्यार्थी मंडळ आणि शिवळे महाविद्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने 'एलआयसी मधील गुंतवणूक, आणि एलआयसी मधील नोकरीच्या विविध संधी' या विषयावर व्याख्यान नुकतेच आयोजित करण्यात आले होते.ठाणे विभागातील खोपोली शाखेचे विकास अधिकारी आणि शिवळे महाविद्यालयमधील माजी विद्यार्थी, १९९७ सालचे विद्यार्थी परिषदे चे जनरल सेक्रेटरी, श्री.शिवळे पुरस्कार प्राप्त, इंग्रजी विभागातील पहिल्या बॅचचे विद्यार्थी विनायक घुडे यांनी महाविद्यालयमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी एलआयसी मधील गुंतवणूक आणि एलआयसी मधील नोकरीच्या विविध संधी कशा आहेत. त्याचप्रमाणे एलआयसी चा विस्तार किती मोठा आहे. स्पर्धेच्या युगात स्पर्धा परीक्षा खूप महत्वाच्या आहेत. एलआयसी मध्ये विमा प्रतिनिधी ते एलआयसी ऑफिसर परीक्षा कशा असतात? ते पटवून दिले.